# प्रकरण पाचवे

# समारोप

## प्रकरण पाचवे

# समारोप

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, मुस्लिम साहित्य, आदिवासी साहित्य, कामगार साहित्य इत्यादी प्रकार नव्याने आले. त्यापैकी दलित साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सर्वच प्रवाहात कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, कविता आणि वैचारिक लेखन विपुल प्रमाणात निर्माण झालेले आहे. आंबेडकरपूर्व काळामध्ये गोपाळबाबा वलंगकर, किसन फागोजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे इत्यादींनी काव्य आणि वैचारिक लेखनाला प्रारंभ केला. दलित शाहिरांनी शाहिराच्या माध्यमातून रंजनाबरोबर प्रबोधनही केले आहे. तथापि आंबेडकरी कालखंडामध्ये दलित अभिव्यक्तीला तत्त्वज्ञानाची बैठक मिळाली आणि दलित साहित्य हा एक आगळा-वेगळा प्रवाह मराठी साहित्यात येऊन दाखल झाला. डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळे भारावून गेलेला दलित माणूस आपल्या वाट्याला आलेले अनुभव साहित्याच्या माध्यमातून अधिक परिणामकारकतेने मांडु लागला. त्यामुळे दलित कविता विपुल प्रमाणात आणि गुणात्मकरित्या उच्च दर्जाची झाली आहे.

दलित कवींनी आपल्याला सोसाव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचारांच्या वेदना वास्तव स्वरुपात शब्दबद्ध केलेल्या आहेत. समाजाकडून जी निकृष्ट दर्जाची वागणूक मिळते त्याबद्दलचा संताप आणि दु:ख अतिशय परखड शब्दात ते व्यक्त करताना दिसतात. कवितेतील या वेदनेच्या आणि चीडेच्या पाठीमागे एक संवेदनशील मन आणि सामाजिक जाणीव प्रामुख्याने आहे. म्हणूनच दलित कविता ही सामाजिक जाणिवेची कविता आहे असे म्हणता येते.

दलित कवी स्वत:ची सामाजिक जाणीव व्यक्त करतानाच त्यातून सामुहिक लढ्याची प्रेरणासुद्धा देतात. चळवळ उभी करण्याची प्रेरणा आणि त्यासाठी आवश्यक असणारे बळ बहुसंख्य दलित कवितेतून आलेले आहे. दलित कविता रोखठोक शब्दात सामाजिक

जाणीव, सामाजिक विषमता चव्हाट्यावर मांडणारी आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील अत्यंत प्रभावी असा हा वाङ्मय प्रकार आहे.

दलित साहित्य कशाला म्हणावे याविषयी अनेक विचारवंतांनी लेखकांनी, तत्त्ववेत्यांनी, चिंतकांनी वेगवेगळ्याप्रकारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. काहींच्या मते दलित लेखकाने दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. बाबुराव बागूलांचे मत यापेक्षा निराळे असून त्यांच्या मते माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान मानणारे वर्ण, वंश, जातिभेदाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय. दलित साहित्यामध्ये दलित जीवनाचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे दलितांच्या भावना त्यांचे विचारदेखील अभिव्यक्त होताना दिसतात. हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला. अस्पृश्य म्हणून समाजापासून दूर गावकुसाबाहेर राहणारे सर्वच दलित या वर्गात येतात. तिथे राहणाऱ्यांनी स्वत:चे दु:ख आणि वेदना ज्यातून मांडले आहे तेच खरे दलित साहित्य होय. असे मुक्तिबोधासारखे विचारवंत मांडतात. लेखक दलित वर्गातला असणे यापेक्षा त्याच्या साहित्यातून दलित जाणीव प्रकट होणे हे महत्त्वाचे लक्षण होय. दलित वर्गातील सर्वच सहित्यिकांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेबद्दलचा संताप आणि विद्रोह यांचा आविष्कार केला आहे. दलित साहित्यात चीड, संताप, बंडखोरी अशा प्रवृत्तीविषयीची काही लक्षणे कलात्मकरित्या आविष्कृत झाली आहेत. असे गं.बा. ग्रामोपाध्ये म्हणतात. त्यांचे हे मत असून दलित साहित्याची संकल्पना योग्य प्रकारे स्पष्ट करणारे आहे. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात त्याप्रमाणे दलित साहित्याची चळवळ हा मुक्तीसंग्राम आहे. दलित माणूए व्यवस्थेस विरूद्धचा लढा देऊन मुक्त होऊ पाहतो. आत्मसन्माने जगू इच्छितो. त्यातून तो स्वत:ला शोधतो हे सर्व त्याने आंबेडकरांच्या विचारामुळे आणि सक्रिय लढ्याच्या प्रेरणेमुळे केले आहे. एकंदरीत, माणसाच्या प्रतिष्ठेचे आणि माणुसकीचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी लिहिले गेलेले आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव तीव्रपणे जाणवणारे असे जे साहित्य ते म्हणजे दलित साहित्य होय. सर्वच दलित

साहित्यात विशेषत: कवितेत ही जाणीव प्रामुख्याने प्रकट झालेली आहे. त्यामुळे दलितांची चळवळ आणि दलित साहित्य यांच्या परस्पर संबंध आहेच.

दलित कवितेची प्रेरणा आणि दलित साहित्याचा उगम बुद्धकाळात झाला आहे असे काहीजण म्हणतात तर काहीजण संत चोखामेळा पर्यंत दलित कवितेचा मागोवा घेतात. काहींनी महात्मा फुले तर कांहीनी किसन बनसोडे यांच्यापर्यंत दलित साहित्याचा मागोवा घेतला आहे. तथापि, ज्यांनी पिळल्या जाणाऱ्यांची आणि अन्याय सोसणाऱ्यांची वेदना प्रकट केली आहे ते सर्वच दलित साहित्याचे प्रेरणास्त्रोत ठरतात.

दलित साहित्याचे उगमस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार त्यांची जीवनदृष्टी व चळवळीची प्रेरणा हेच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'बहिष्कृत' च्या पहिल्या अंकामध्ये लिहिल्याप्रमाणे सत्ता, संपत्ती ज्ञान नसल्यामुळे ब्राह्मणोत्तर समाजाची प्रगती मागासलेली आहे. त्यांच्या दारिद्रयातच दु:खाची भर पडलेली आहे. कारण आपला चरितार्थ चालविण्यासाठी त्यांना शेती, व्यापार, उद्योग इत्यादी गोष्टी नाहीत. परंतु या समाजावर सामाजिक विषमतेचा, बहिष्कृततेचा झालेला परिणाम अतिघोर आहे. दौर्बल्य, दारिद्रय व अज्ञान या त्रिवेणी संगमात दलित समाज वाहवला आहे. परंपरेपासूनच चालत आलेली गुलामगिरीची जाणीवच त्यांना मागे नेत आहे. यातच हा दलित समाज धन्यता मानून आहे. तेच योग्य मानून समाधानी आहे. परंतु येथे कायद्याने जरी अस्पृश्यता गेली तरी ती कायद्यापुरतीच मर्यादित आहे. अजूनही अस्पृश्यांना मंदिरामध्ये प्रवेश मिळत नाही.

आज दलित समाज अन्याय, अत्याचार, हालअपेष्टांना सामोरा जात आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या क्रांतीकारी लेखणीतून दलित समाजामध्ये नव जागृतीची प्रेरणा निर्माण करून आत्मविश्वासाची भावना निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजबांधवांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. प्रतिकुल परिस्थितीत हालअपेष्ट सोसून शिक्षण घेतलेल्या तरुणांनी, आपले जीवनानुभव शब्दांतून मांडण्यास सुरुवात केली हाच दलित साहित्याचा पहिला हुंकार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेऊनच ही दलित मंडळी आपले विचार, भावभावना व्यक्त करतात. सर्वप्रथम त्यांनी आपले विचार कवितेमधूनच व्यक्त केले. अशी दलित कविता ही ते जीवन प्रत्यक्षात जगणाऱ्यांची कविता आहे. स्वत:च्या जीवनामध्ये आलेले भीषण अनुभव, भयंकर दु:ख त्यांनी कवितेतून मांडले म्हणजेच त्यांची कविता जगण्यातून निर्माण झाली आहे. या जळत्या जीवनामागे असलेली कारणे ती शोधते. दलित कवींची संवेदनशीलता ही आत्मानुभूतीच्या खोल व भरभक्कम पायावर उभी आहे. म्हणूनच प्रतिभेच्या साहाय्याने निर्माण केलेल्या स्वप्नरंजित कल्पनारम्य अशा जगाशी तिचे नाते बंडखोरीशी आहे. दलित कवितेचा आविष्कार, तिचा आकार, तिचा आशय, घाटरुप व शब्दकळा ही आजवर निर्माण झालेल्या कवितेपेक्षा स्वयंभू अशी आहे. आजच्या दलित कवितेचे स्वरुप आत्मप्रकटन व आत्मरेखाटन असे असून ही कविता अस्मितेने भरलेली आहे. दलित जाणिवेतून व आत्मशोधाच्या अंगाने ही कविता विकसित होताना दिसते.

दलित कवितेच्या पूर्वकालातील संत कवितेत सामाजिक विषमतेची जाणीव असून तिच्यातील सामाजिक समता फक्त अध्यात्मापुरतीच मर्यादित आहे., त्यांनी समाजातील रुढ वर्णव्यवस्था बदलण्याविषयी काहीही म्हटलेले नाही. दलित साहित्याने मात्र त्याचा आग्रह धरलेला आहे. अशाप्रकारची दलित कवता १९६० नंतर जन्मलेली आहे. या सर्वच कवींना शिक्षणाचे पाठबळ आणि आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा लाभली आहे. त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने वेदना आणि विद्रोह प्रकट झाला आहे. त्यांनी जे प्रत्यक्ष अनुभवले जे दु:ख स्वत: भोगले तेच त्यांनी काव्यात मांडले आहे.

व्यक्ती जेव्हा समाजजीवन जगत असते तेव्हा व्यक्ती व्यक्तींच्या परस्पर संबंधातून, प्रभावातून अनेक बरे वाईट अनुभव येत असतात. हे अनुभव कधी सुखद तर कधी दु:खद, कधी आशा पल्लवित करणारे तर कधी नैराश्याचे असतात. सामाजिक नीती-नियम, रुढी-परंपरा, प्रगती-परागती, सत्ता आणि स्पर्धा इत्यादी अनेक गोष्टीमुळे व्यक्तीला येणारे अनुभव विविध प्रकारचे असतात. अनुभवामुळे मनात निर्माण होणारी भावना जेव्हा साहित्यातून व्यक्त होते तेव्हाच ते सामाजिक जाणीव प्रकट करणारे साहित्य होते.

दलित कवयित्रींची कविता ही भावनोत्कटतेपेक्षा चिंतनशीलतेशी उत्कट नाते सांगून जाते. स्वत:बरोबर वाचकालाही अंतर्मुख व्हायला लावून नव्या विचाराकडे झेपावण्यास सिद्ध करणारी ही कविता आहे. 'दिशा' या ज्योती लांजेवार यांच्या काव्यसंग्रहातून दलित समाजातबदल घडवून आणण्याची ताकद आहे. समाजामध्ये वावरत असताना जे जे अनुभव आले ते ते काव्यरुपाने आविष्कृत झाले आहेत. सामाजिकता हा या कवितेचा प्राण आहे. कवयित्रीचे दु:ख अतिशय बोलके व व्याकूळ करणारे आहे.

एकूणच दलित कविता ही समाजपरिवर्तनाची व प्रबोधनाची सशक्त सुंदर अभिव्यक्ती आहे. दलित कवींच्या कवितेतून प्रकट होणारे हे दु:ख फक्त त्यांच्या एकट्याचे नसून पूर्ण समाजाचे दु:ख तो व्यक्त करीत असतो. म्हणूनच दलित कवितेचा नायक हा समाज आहे. दलित साहित्याची निर्मिती ही आंबेडकरांच्या विचारातून, चळवळीच्या प्रेरणेतून झालेली आहे. कवींनी आपल्याला सोसाव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या वेदना वास्तवरुपात शब्दबद्ध केलेल्या आहेत. दलित कविता रोखठोक, परखड शब्दात सामाजिक जाणीव प्रकट करणारी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने या दलित समाजाला एक नेता मिळाला आणि या समाजाचे सर्व चित्रच बदलून गेले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन अज्ञानरुपी अंध:कार नाहिसा करण्याची प्रेरणा दिली. आपण माणसं आहोत माणसासारखे जगले पाहिजे, इतर माणसाप्रमाणेच आपल्यालाही माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क मिळालेच पाहिजेत ह्या आंबेडकरांच्या विचारामुळे दलित मंडळी शिकू लागली. आपले वेगळेपण दाखविण्यासाठी प्रवृत्त झाली. आपण आपल्या पूर्वायुष्यात जे अन्याय सोसले, जे अत्याचार भोगले त्याविषयीचे दु:ख आणि संताप ते कवितेच्या माध्यमातून व्यक्त करू लागले. ती पहिल्या पिढीची दलित कविता होय.

१९६० नंतरच्या कवितेला प्रभावित करणारी कविता म्हणून नारायण सुर्वे यांच्या कवितेचा उल्लेख करायला हवा. सुर्वे यांची कविता म्हणजे थकल्याभागल्या श्रमकऱ्यांची भावकथा, जीवनाशी ती एखाद्या योद्धाप्रमाणे ती झुंज देते. कामगार आणि दलित जीवनाचा

प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या कवितेतून सामाजिक क्रांतीचा उद्घोष आढळतो. सुर्व्यांच्या मनातील सामाजिकतेचा विस्फोट 'चार शब्द' या कवितेत झालेला दिसतो. कामगार असल्याचा सार्थ अभिमान आणि त्यांच्यातील रोजीरोटीचा दैनंदिन व्यवहार त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केला आहे.

नामदेव ढसाळांची कविता अन्य दलितांच्या कवितेपेक्षा अंतर्बाह्य निराळी आहे. ढसाळांची कविता ही प्रस्थापित मूल्यांचा विध्वंस करणारी कविता आहे. त्यामुळे शब्दांचा आणि भाषेचा निखारा तिला मान्य नाही. आशय हेच तिचे बलस्थान आहे. ती खोट्या-अमूर्त आणि कल्पनेच्या जगात विसावून शकत नाही. या हीन-दीन समाजाची परिस्थिती बदलवू पाहणारे आणि त्यांना माणुसकीकडे नेणारे, त्यांच्यात क्रांतीची बीजे रोवू पाहणारे दलित-मुक्ती आघाडीचे मान्यवर नेते आहेत. जगण्यातील असह्य दाह सभोवतालच्या परिस्थितीतील असहायता, भेदाभेद, चांगल्या वाईटाचे भावनात्मक आकलन त्यांच्या कवितेत प्रचंड प्रमाणात दिसून येते. दया पवार यांनी आपल्या कवितेतून दलितांचे अनुभवविश्व व्यापक व वास्तव स्वरुपात प्रकट केले आहे. 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहामधील कवितेतून त्यांनी स्वतःच्या जीवनात भोगलेले दुःख प्रगट केले आहे. पवार यांची कविता वास्तव जीवनामधील अनुभव भेदकपणे चित्रित करते.

आपल्या व्यापक जीवनानुभवातून निर्माण झालेली काव्याची सखोल जाणीव व तिचा परिणामकारक आविष्कार ही मेश्रमांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. कवी वामन निंबाळकरांनी समाजामध्ये वाट्याला आलेले गावकुसाबाहेरचे दुःख आपल्या कवितेतून मांडले आहे. गावकुसाबाहेरचे जिणे म्हणजे दारिद्रय, अज्ञान, आणि आपार कष्ट हेच आहे. अपार दुःख सोसूनही त्याबद्दलची तक्रार आम्ही आजवर कधीच मांडली नाही. अ ाज मी तक्रार म्हणजेच दलित समाजाची कैफियत समाजापुढे मांडतो आहे.

पहिल्या पिढीतील प्रमुख पाच कवींच्या कवितेचा थोडक्यात आढावा घेऊन पहिल्या पिढीच्या दलित कवितेचा आढावा घेतला आहे. पहिल्या जोमदार लाटेनंतर दलित कवितेत काहीसा एकसूरीपणा, साचेबंदपणा हळूहळू येऊ लागला. त्यामुळेच दलित कवितेमध्ये

साचलेपणा आला आहे असे आरोपही अनेक टीकाकारांनी केले. अभ्यासाच्या मर्यादा लक्षात घेऊनच दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीमधील प्रमुख पाच कविंचा अभ्यास केला आहे. दुसऱ्या पिढीमधील प्रमुख कवी प्रल्हाद चेंदवणकरांनी आपल्या 'ऑडिट' या काव्यसंग्रहामधील कवितातून असंतोष, भ्रमनिरास, नैराश्य, यंत्रयुगात आलेले औदासीन्य अशा वेगवेगळ्या प्रकारच्या भावना प्रकट केल्या आहेत. त्यांनी 'कप एक चहाचा' या कवितेमध्ये 'तुटलेल्या कानाचा - फुटलेल्या तोंडाचा' अशी समर्पक ओळ लिहून आपल्या समाजाचे भेदक आणि जिवंत चित्रण केलेले आहे.

आत्यंतिक दारिद्र्य व कष्टमय जीवनातून शिक्षण घेतलेले त्र्यंबक सपकाळे यांचा 'सुरुंग' हा काव्यसंग्रह होय. डॉ. बाबासाहेबांच्या विधायक कार्याचा व विचार प्रणालीचा आणि बुद्धाच्या तत्त्वविचाराचा पुनरुच्चार ही त्यांच्या कवितेची प्रेरक शक्ती आहे. अर्जुन डांगळे हे सामाजिक व राजकीय चळवळीत असलेले एक साहित्यिक होत. दलित पँथरच्या कार्यकर्त्यांच्या मुखातून निघालेल्या संघर्षात्मक घोषवाक्यांचे रुप त्यांनी आपल्या कवितांना दिले आहे. अर्जुन डांगळे यांच्या कवितेमधून आलेला संघर्ष हा दलित जनतेपुरताच मर्यादित नाहीतर ती कविता जात, समाज, देश त्यांची बंधने तोडून विश्वाला गवसणी घालू पाहते. कवी यशवंत मनोहरांची कविता प्रामुख्याने विद्रोहाची कविता आहे. ईश्वरशाही, अध्यात्म, कर्मविपाकाच्या नावाखाली येथे जे सतत शोषण केले गेले त्या शोषणाविरूद्ध लढा देण्यासाठी ही कविता पुढे आलेली आहे. कवी बळवंत कांबळे यांचा 'निषेध' हा काव्यसंग्रह होय. दलित समाजावर नित्यनेमाने होणारे अत्याचार आणि अन्याय पाहून व्यथित होणारा आणि समाजाच्या विकासासाठी आसुसलेला हा कवी आहे. विसाव्या शतकातही माणसावर होणाऱ्या जुलूम, अत्याचाराविषयी कोरडी सहानुभुती दाखविणाऱ्या मानवी प्रवृत्ती पाहून हा कवी व्यथित होतो.

वरील सर्व कवींच्या कविता पाहिल्यानंतर आपल्याला असे जाणवते की, दुसऱ्या पिढीतील कविता ही प्रबोधन घडवितेच शिवाय 'स्व'चा शोध घेताना दिसते.

डॉ. आंबेडकरांनी, महात्मा फुले व गौतम बुद्धांनी, कार्लमाक्सने काय सांगितले, शिकवले याचा पुनरुच्चार हे कवी करताना दिसतात.

तिसऱ्या पिढीतील कवींनी दलित कवितेला एक वेगळा आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. दलितांची दु:खे आज शतकानुशतके चालत आलेली आहेत. कायद्याने केवळ वरवर, दिखाऊ स्वरुपात अस्पृश्यता नष्ट झालेली आहे. आंबेडकरांना अपेक्षित असलेले मुलभूत सामाजिक परिवर्तन एवढा काळ उलटून सुद्धा घडून आलेले नाही. परिवर्तनासाठी चळवळ, लढे, संघर्ष झाले. परंतु दलित समाजातील नेत्यांच्या, पुढाऱ्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे, मतलबीपणामुळे तळागाळातला माणूस तिथेच राहिला आहे. ही आत्मशोधातील नवी जाणीव या पिढीतील कवींना झालेली आहे.

कवी वाहरु सोनवणे यांच्या 'गोधड' या काव्यसंग्रहाच्या शीर्षकापासूनच एका फाटक्या समूहजीवनाचा निर्देश होतो. समकालीन दलित कवितेत अरुण काळे यांच्या कवितेचे मोठे योगदान आहे. 'सायरनचे शहर' या काव्यसंग्रहात मूलतत्त्ववादाचे मूळ आणि कूळ यांचा शोध काळे घेताना दिसतात. 'सायरनचे शहर' सर्वसामान्यांच्या जगाला हसणारे आणि नकाराधिकार वापरणारे आहे. मुंबई शहराच्या विविध पैलूंचे आक्राळ-विक्राळ रुप अरुण काळ्यांच्या कवितेतून साकार केले आहे. दलित कविता म्हणून अरुण काळे यांची कविता श्रेष्ठ आहेच. शिवाय तिला चिंतनाचे तेजही अधिक आहे. दीपक त्रिभुवन यांची कविता आत्मशोधातून चिंतनगर्भतेकडे झुकणारी आहे. कवीने काव्यसंग्रहाला दिलेले शीर्षक 'खोल खदानी' हेही अत्यंत सूचक आहे. त्यांच्या कवितेमधून माणसामाणसातील विश्व सतत लढत ठेवण्याचा प्रयत्न इथल्या व्यवस्थेने केला आहे. शब्दाची ताकद, त्याचा अस्त्र म्हणून होऊ शकणारा वापर याचे भान कवीला असल्याचे कवितेतून प्रत्ययाला येते. लहू कानडे यांनी आपल्या 'टाचाटिभा' या काव्यसंग्रहामधून एक सांस्कृतिक जग उभे केले आहे. अस्पृश्यतेने, जातिव्यवस्थेने दिलेल्या अटळ दु:खाची कहाणी 'टाचाटिभा' मधील अनेक कवितातून व्यक्त झालेली दिसते. राम दोतोंडे यांचा 'रापी जेव्हा लेखणी बनते' या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी दलित चळवळीला एका नव्या जाणिवेचीओळख

करून दिली. या काव्यसंग्रहामध्ये इतिहासाबद्दलचे चिंतन परखडपणे जाणवते. हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

डॉ. बाबासहोब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन जसे कवींनी लेखन केले तसे दलित कवित्रिनींही काव्यलेखन केलेले आहे. त्यामध्ये हिरा बनसोडे, सुगंधा शेंडे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, इत्यादी कवयित्री सातत्याने लेखन करीत आहेत. दलित कवितेसंदर्भातील विविध समीक्षकांनी आपली मते मांडली आहेत. दया पवार आपली कवितेविषयीची भूमिका मांडताना म्हणतात, 'कविता लिहिण्यापूर्वी तशी कोणतीही भूमिका मनात नसते. कविता कधी घडणार आहे याची पुसटशी जाणीवही नसते. दैनंदिन जीवनातील एखादी घटना अनुभवल्यावर त्यावरून मला कविता सुचते. तर ज्येष्ठ समीक्षक रा.ग. जाधव म्हणतात या कवितेने स्वातंत्र्यासाठी लढण्यास हाक दिली. पारतंत्र्यातील जीण्याचे भयावय वास्तवरुप दाखविले. सनातन प्रवृत्तीचा निषेध केला. सदा कऱ्हाडे यांच्या मते दलित कविता आपले दु:ख आणि चीड व्यक्त करण्यासाठीच जन्मली आहेत. ती आंबेडकरी चळवळीतून फोफावली आहे.

कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे कवी आहेत. त्यांचे 'आता होऊन जाऊ द्या !' व 'आणि शेवटी काय झाले ?' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. कवी लोकनाथ यशवंतांनी आपला विद्रोह अतिशय संयमीपणाने व्यक्त केला आहे. या दोन्ही काव्यसंग्रहाच्या शीर्षकातच निर्णायक संघर्ष करण्याचे सुस्पष्ट आव्हान आहे.

कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीमधील शतकाच्या शेवटच्या दशकातील कवी आहेत. प्रशासकीय सेवक कार्यरत असणाऱ्या लोकनाथ यशवंतांचा 'आता होऊन जाऊ द्या !' हा पहिला काव्यसंग्रह १ जानेवारी १९८९ ला प्रकाशित झाला. प्रस्तुत काव्यसंग्रहाला अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, दमाणी साहित्य पुरस्कार, डॉ. आंबेडकर शताब्दी गौरव पुरस्कार, मुक्तीबोध कवितासंग्रह पुरस्कार, राज्य पुरस्कार, आणि कवियित्री संजीवनी खोजे पुरस्कार असे सहा सन्मान मिळाले. इंग्रजी व उर्दू भाषेत अनुवाद देखील झाले. 'आता होऊन जाऊ द्या !' या काव्यसंग्रहामध्ये निर्णायक संघर्षाचे स्पष्ट आव्हान कवीने केले आहे.

सामाजिक परिवर्तन आणि मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचे कावेबाज रुप कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत दिसून येते. देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरीही समाजव्यवस्था फारशी बदलली गेली नाही. स्वातंत्र्यानंतर जे सामाजिक अभिसरण अभिप्रेत होते ते घडलेच नाही. या देशातच मूलतत्त्वादी प्रवृत्तींनी आपली मुळे भक्कम केली आहेत. संस्कृतीच्या नावाखाली जात-पात-धर्म जपणाऱ्या प्रवृत्तीबद्दलचा संताप कवी उपरोधिक शैलीत व्यक्त करतात. 'लेप्रसी' या कवितेच्या ओळीमधून म्हणतात,

''गावात दगडांचे देव आणि दगडांचीच देवालयं''

येथे एक सामाजिक वास्तव कवीच्या मनाने टिपले आहे. या समाज व्यवस्थेत माणसांना माणसाबरोबर राहू दिले जात नाही. त्यामुळे कवीला येथील संस्कृतीबद्दल घृणा वाटते. आपल्या वाट्याला जे आले आहे ते भोगत जगत आहेत. 'एका मोर्चाचा शेवट' या कवितेतून कवी आत्मशोधाकडून अंतर्यामी दुखावलेला आहे. मूलतत्त्ववादी चांगल्या गोष्टी येथै रुजूच देत नाहीत. 'दिशा दर्शक बोटच तोडले' दलित समाजात फूट पाडण्याचा हेतू ठेवूनच कार्य करतात. इथली व्यवस्थाच सडकी कुचकी आहे. असे कवीला जाणवते. 'एक शून्य आणखी' या कवितेत समाजाला आर्थिक विषमतेने कसे ग्रासलेले आहे हे तो सांगतो. येशू ख्रिस्ताला जसे खिळे ठोकले तसे या कारखानदारांनी मजुरांना खिळे ठोकले आहेत. हे खिळे आहेत अत्याचाराचे, अन्यायाचे, परावलंबनाचे. अनेक शतकांच्या अत्याचारी इतिहासाने दलित समाजाला ग्रासलेले दिसते. आंबेडकरवादी चळवळीने काय केले आहे हे ढोंगी व परंपरावादी नेत्याना ठणकावून सांगतो.

''पूर्वी जोहार करणाऱ्या या हातांत
आता तीक्ष्ण हत्यारं आहेत.''

आता हात जोहार करणार नाहीत. त्यांनी हातात तीक्ष्ण हत्यारे घेतली आहेत. हत्यार बनलेला विचार तलवारीपेक्षा प्रखर असतो. हाच विचार पुढे परिवर्तन घडवून आणतो. अशी परिवर्तनवादाची भूमिका कवीने अनेक कवितांतून मांडली आहे. 'पहिल्या पावसाची गोष्ट', 'पलायन', 'मोर्चा', 'युद्ध', 'अतिक्रमण', 'गृहयुद्ध', 'प्रवाह', 'कथा' ह्या कवितांमधील

समाज जीवनाची स्थिती गती हृदय पिळवून टाकणारी आहे. समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाविषयीच्या कवीच्या विद्रोही भावना ओळी-ओळी मधून भडकून उठताहेत.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेवरती नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा प्रभाव पडलेला दिसतो. या देशातील अस्पृश्य समाज कैक शतकांपासून नागविला जातो आहे. कधी देवाच्या, कधी धर्माच्या तर कधी कर्मवाद्याच्या आणि पुनर्जन्माच्या नावावर या चेहरा नसलेल्या आत्मविस्मृत समाजास निराशावादाने ग्रस्त केले आहे. त्याचे व्यवस्थेकडून शोषण झाले आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतून अनेकदा 'मी' चा आविष्कार होतो. जरी आत्माविष्कार असला तरी दलित कवी 'मी' मधून 'आम्हीचा' म्हणजे समूहमनाचाच आविष्कार करीत असतो. 'आरंभ' या कवितेत उगारलेल्या काठीच्या दहशतीखालीच आपण आजवर जगलो. प्रस्थापित समाजव्यवस्था, रूढी, संस्कृती यांच्या वर्चस्वाखाली जगलो. आपण सतत कुणालातरी भीतच राहिलो, 'भित्यापाठीमागे ब्रह्मराक्षस' या म्हणीप्रमाणे आपल्याला सतत ते काठी उगारून भीतीच दाखवित राहणार म्हणूनच न भिता आता त्या काठीवरच वार केला पाहिजे असे लोकनाथ यशवंत आपल्या समाजबांधवाना सांगतात. आपल्याच समाजाच्या स्थितीचे निरीक्षण करून चिंतन करताना, आत्मशोध घेताना कवीला जे कळते, जाणवते ते त्याने 'शस्त्राच्या कविता'मध्ये सांगितले आहे. आंबेडकरांच्या भाषणाचा समाजातील माणसावर किती मोठा प्रभाव होता, त्यांचे अप्रत्यक्ष किंवा सूचक बोलणेसुद्धा किती प्रभावी होते हे कवीने 'कांजी' कवितेत 'कोंडवाडा' हे समाजव्यवस्थेचे प्रतीक वापरुन फार सुंदरपणे सांगितले आहे.

समाजव्यवस्था जर आपल्यावर अन्याय करीत असेल तर अशी व्यवस्थाच आपण मोडली पाहिजे. त्यासाठी आपण स्वत:च प्रयत्न केले पाहिजेत. हे नवे ज्ञान ही नवी जाणीव आंबेडकरांच्यामुळेच आपल्या समाजाला लाभली. समुहांना नेहमीच त्यांच्या अस्तित्वाची ओळख व आत्मभानाची जागृती देण्याची गरज असते. ते काम आंबेडकरांनी केले.

लोकनाथ यशवंतानी प्रियेला उद्देशूनही कांही कविता लिहिल्या आहेत. त्यातील भाव उत्कट आहे. प्रेमामध्ये वासना नाहीतर कर्तव्य कठोरतेची भावना आणि प्रेम जिव्हाळा आहे हे एक नवे वळणच कवीने दिलेले दिसते. कवी प्रेयसीला उद्देशून म्हणतो 'तुझी मुळं माझ्यात खोलपर्यंत रुतलेली आहेत. प्रत्येक मुळ तप्त आहे' कवी तू ती मीच, मी तो तूच असा भाव व्यक्त करतो.

'तो' आणि 'ती' एकरुप होऊन जगू लागले तर त्यांच्या झोपड्या तोडल्या गेल्या. त्यामुळे आनवाणी अनाथासारखे जगणे त्यांना भाग पडले. ह्या वस्तुस्थितीने रडणाऱ्या प्रेयसीची कवी समजूत घालतो. एकमेकांचे दु:ख समजून घेऊन मोकळे होणे महत्त्वाचे असते. याचाच आज अनेकांना विसर पडला आहे असे कवी सुचवतात. 'आपल्या दोघांची झोपडी एकच असती तर ?' असा प्रश्न विचारतो. हा प्रश्न अतिशय मार्मिक आहे. 'गृहयुद्ध' या कवितेत आत्मशोधातून आलेले दु:ख कवीने प्रेयसी पुढे व्यक्त केले आहे. ज्याला साथीदार म्हणावा तोच केसाने गळा कापतो. हे अत्यंत प्रखर सामाजिक वास्तव कवीने 'गृहयुद्ध' या कवितेमध्ये दाखविले आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या कवितेतून प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान केले आहे. सामाजिक वास्तवावर भाष्य करतांना अथवा प्रेयसीशी संवाद करतांना प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात कडक शब्दात भाष्य केलेले आहे. काही कवितात तर अगदी उघड उघड लढ्याचे आव्हान दिले आहे. कवीने आपण आता लाचारी, गप्प बसणे, अन्याय सोसणे सारे सोडून दिल्याचे आणि हाती शस्त्र घेऊन लढण्यास सिद्ध झाल्याचे जाहीर केले आहे. पुढे जाऊन त्यांनी 'युद्ध' या कवितेत प्रस्थापितांना स्पष्ट आव्हानच दिले आहे. 'पाया' या कवितेत कवी म्हणतात लक्षात असू द्या तुमच्या इमारतीच्या पायातले दगड आमचे आहेत. ते आमचं ऐकतात. आम्ही कधीही तुमच्या इमारतीचा पाया हलवू शकतो. असा इशारा कवीने प्रस्तुत कवितेतून प्रस्थापितांना दिला आहे.

प्रस्थापित व्यवस्थापनाला उघड आव्हान देणाऱ्या कवीच्या मनामध्ये नवी समाजव्यवस्था पर्यायी संस्कृती उभी करण्याची इच्छा आहे. माणसा-माणसात भेद केले

जाणार नाहीत. माणुसकी हेच मूल्य घेऊन सर्वांनी जगायचे असल्याने कुणी कुणाला तुच्छ लेखणार नाही. कुणाचा अवमान करणार नाही. प्रत्येकाला जगण्याचा समान हक्क आणि अधिकार असेल अशी नवी समाजव्यवस्था उभी राहील असा आशावाद कवी व्यक्त करतो.

एकंदरीत लोकनाथ यशवंत यांची कविता 'बुद्ध-फुले-आंबेडकर' यांचे विचार जन सामान्यामध्ये रुजवून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे व स्वत:च्या 'निसर्गदत्त अस्मितेसाठी' बुलंद लढा उभारण्याची प्रेरणा देणे या उद्देशाने जन्मलेली आहे. सतत संघर्षाची बोली बोलणारी 'आता होऊन जाऊ द्या !' मधील कविता आहे. दलित कविता ही वेदनेची व दु:खाची आहे. म्हणून त्यात विद्रोह आहे हा विद्रोह आत्मजाणिवेमुळे आला आहे. ही आत्मजाणीव पुराण मुल्यांना नकार देते व नवीन मूल्यांचा स्वीकार करताना दिसते. काव्यसंग्रहाचे 'आता होऊन जाऊ द्या !' हे नाव अतिशय समर्पक असून प्रत्येकाने वाचावा असा चिंतनशील काव्यसंग्रह आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांचा 'आणि शेवटी काय झाले ?' हा दुसरा काव्यसंग्रह १ जानेवारी, १९९५ साली प्रकाशित झाला. त्यांच्या 'आता होऊन जाऊ द्या !' या काव्यसंग्रहाने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. पहिल्या काव्यसंग्रहामध्ये शीर्षकातच निर्णायक लढण्याचे उद्‌गार आहेत. तर या दुसऱ्या काव्यसंग्रहामधील शीर्षकातच शेवटी आपल्या संघर्ष लढ्याचे काय झाले ? याचा शोध घेणार आहे. पाहाऱ्यावर झोपलेल्यांना जागे करणाऱ्या ध्येयाने ही कविता आता बाहेरुन एकवटलेली आहे. पाहरेकरी आता काहीच वाचत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. प्रारंभीच्या काळात आंबेडकरांच्या विचाराचा कृतीशिलतेचा जो मोठा प्रभाव समाजात होता तो आज राहिलेला नाही. नेते, पुढारी, कार्यकर्ते हे पहारेकरी आज सर्व काही सत्ताधारी राजकर्त्यावर सोपवून गेले आहेत. या वास्तवाचीच कवीला चिंता वाटते.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या या काव्यसंग्रहामधील काही कविता समाजातील प्रचलीत वास्तवाचा शोध घेणाऱ्या आहेत. राजकीय संघटनांची फाटाफूट झाली आहे. जाती-जातीमध्येही पोटजातींनी राजकीय एकतेची शक्यताच संपुष्टात आणली आहे.

लोकांना संघर्षासाठी भडकावून स्वत: मात्र नामानिराळे राहणे ही बचावू वृत्ती कवीला खटकते. या गरीब जनतेची जरी वाताहत झाली असली तरी या नेत्यांना त्याची पर्वा नसते. 'दातासाठी हत्तीला मारण्याचे गणित' अशा अत्यंत परखड शब्दात कवीने नेत्यांच्या नेतृत्वाचे पितळ उघडे केले आहे. तसेच नेत्यांचा जयजयकार करणाऱ्या उपाशीतापाशी लोकांनी उन्हातान्हात मोर्चे काढायचे आणि मलिदा मात्र नेत्यांनी लुटायचा ही समाजातील वास्तवता आहे. पळपुट्या आणि कावेबाज नेत्यांना उद्देशून कवीने 'दिशा' या कवितेत स्पष्टच जाब विचारला आहे.

''लेको !
आम्ही आडवे झाल्यावरच
तुम्ही उभे होता''

इथल्या समाजव्यवस्थेनेच स्पष्टपणे सांगितले आहे की, आपण जगण्यासाठी नालायक आहोत. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत नवी सिमेंटची घरे आली. भरपूर जंगलतोड झाली. प्यायला पाणी मिळेना अशी स्थिती झाली आहे. हे प्रखर भीषण वास्तव कवीने सांगितले आहे. कापसासारखी मृदु आणि कोमल असलेली माणसांची हृदये कठोर झाली आहेत. सर्वत्र रुक्ष व्यवहार चालू आहे. माणुसकी, ममता, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा या जिवंत हृदयाच्या खुणा कुठे दिसतच नाहीत.

जनसामान्यातील नेते मंडळी फुले, डॉ. बाबासहोब आंबेडकर यांच्या विचारांचे भांडवल करतात. स्वत:चा स्वार्थ साधतात. सध्याच्या परिस्थितीमध्ये परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न 'मुठी वळल्या हाताचा जत्था' या कवितेमध्ये केला आहे. चालू घडामोडीवर व वर्तमान व्यवस्थेबद्दल हा कवी वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडणी करणारा आहे. 'भविष्य' या कवितेत सामाजिक विषमतेवर प्रखर हल्ला चढविला आहे. ती आमचा-तुमचा विचार करत नाही. दोषांवर बोट ठेवण हे इथल्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. त्यांची 'माधुरी अग्निहोत्री म्हणते – मी तुझ्यावर प्रेम करते' ही कविता समाजामध्ये असणाऱ्या दोन सांस्कृतिक जगाचे स्वरुप साकारते आहे. समाजामध्ये जे जे शोषित, दुर्बल आहेत त्या सर्वांचीच दु:ख वाहणारी ही कवी लोकनाथ यशवंताची कविता आहे.

नकार, विद्रोह आणि आशावाद हा ही कवी यशवंत यांच्या कवितेतून प्रकट झालेला आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेत मान्य असलेल्या देश, देव, संस्कृती, धर्मग्रंथ, धर्माचरण इत्यादी गोष्टींना कवीने नकार दिला आहे. त्यांच्या 'धर्म' या कवितेमध्ये ते समाजातील रुढी परंपरेवर कठोर हल्ला करतात. जरी लोकांनी धर्माला नाकारले असले तरी आंबेडकरी अनुयायांनी देव नाकारणाऱ्या बुद्धालाच देवत्व करून टाकले आहे.

येथे अस्पृश्यता हजारो वर्षे आबाधित नांदत होती. तिच्या विरूद्ध डॉ. बाबासहोब आंबेडकरांच्याप्रमाणे एकाही राजाने, महाराजाने, संताने, महंताने अथवा ईश्वराने आवाज उठविला नाही. 'तर पृथ्वीचा स्फोट झाला असता !' या कवितेमधून पूर्वीपासूनच दलित समाज हा समस्त शोषित दलित श्रमिकांचा आहे. जीवन मरणाचे भयानक प्रश्न कवीने आपल्या काव्यातून मांडले आहेत. जनतेसाठी सर्व काही करू पाहणारी नेते मंडळी फक्त स्वत:च्याच सुधारणा घडवून आणतात. ऐनवेळी पुढारी लोक हे पलायन करतात. म्हणूनच कवी म्हणतात –

'उगाचच सोन्याचा दात दाखविण्यात अर्थ नाही'

समाजाचे नेतृत्व करणारे आतून आणि बाहेरुन किती बदलले आणि सडले आहेत, ही जाणीव लोकनाथांनी अनेक कवितांतून व्यक्त केली आहे.

राजकीय व सामाजिक चळवळीवरील भाष्य करणाऱ्या काही कविता कवी लोकनाथ यशवंत यांनी लिहिलेल्या आहेत. १९६० नंतर दलित कवितेवर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. 'दातासाठी हत्तीला मारण्याचे गणित' ही लोकनाथ यशवंत यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या परिणामातून जन्माला आली आहे. ज्यांच्या हातात दलित समाजाची विचारांची, साहित्याची, प्रबोधनाची आणि नेतृत्वाची मशाल दिली त्यांनी दलित समाजाची केवळ फसवणूकच नव्हेतर दिशाभूलही केली आहे. असे चित्र कवीला दिसते. 'रिपब्लिकन' ह्या कवितेत दिशाभूल झालेल्या आणि परिस्थितीने गांजलेल्या कार्यकर्त्यांची झालेली कुचंबणा ते व्यक्त करतात. डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहे. 'महतप्रयासाने इथवर आणलेला काफिला पुढे न्या पण मागे खेचू नका'.

बाबासाहेबांनी म्हटल्यावरही जनसामान्यांचा आदर आणि जिव्हाळा यांचा लाभ उचलणारे नवेच बहुरुपी नव्यानव्या नावाखाली समुहाला वापरु लागले. हा नेत्यांचा स्वार्थ पाहून कवी अस्वस्थ होतात.

'चळवळ' या कवितेतून कवी लोकनाथ यशवंत यांनी या नेत्यांचा पाणउतारा अत्यंत परखड शब्दात केला आहे. प्रस्थापितांनी दलितांचे पिढ्यान्‌पिढ्या शोषण केले. नेहमी त्यांना काडीकचऱ्याप्रमाणे समजले. सध्याच्या परिस्थितीमध्येही दलितांचे शोषण चालूच आहे. याबाबत त्यांच्या काही कवितांतून त्वेषपूर्ण ओळी आल्या आहेत. जसे –

'आता दगलबाजांच्या टकुरीवर हाणतो'

असे आक्रमक शब्द कवी वापरतात. कवीने येथे फक्त दलित समाजावरच भाष्य केले नाही तर एकंदर समाज जीवनाबद्दलचा त्यांच्या मनात तीव्र दाहक विद्रोह पूर्णपणे भरलेला आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या 'आणि शेवटी काय झाले ?' मधील कविता वाचकाच्या मनावर कवितेची जाणीव कोरुन ठेवावी असे वाटायला लावतात. त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य पाहत असताना जाणवते की, सर्वसामान्य जनतेला समजेल अशीच भाषा लिहितात. या काव्यसंग्रहामधून त्यांनी समाजाचे, नेत्यांचे परीक्षण केले आहे. म्हणूनच 'आणि शेवटी काय झाले ?' हा काव्यसंग्रह हिशोब तपासणीचा आणि स्वपरिक्षणाचा अहवाल आहे असे म्हणता येते. कवीने आपल्या कवितेच्या भाषाशैलीमधून समाजाकडे आणि व्यवस्थेकडे चौकस बुद्धीने पाहिले आहे. जे जे दिसले जे जे जाणवले आणि व्यवस्थेने जगताना जे जे अनुभवायला लावले ते कवितेच्या माध्यमातून मांडले आहे. कवी लोकनाथ यशवंत यांच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कविता सलग वाचल्यातर त्यातून परिवर्तनाचा विचार समर्थपणे व्यक्त होताना दिसतो. त्यांची कविता जनसामान्यांची वर्तमान व्यथा आहे. त्यासाठी त्यांनी स्वीकारलेली भाषाशैली, आशयद्रव्य, अभिव्यक्तीचे साधेसरळ माध्यम अशा अनेक अंगांनी त्यांच्या कवितेचे नाते तुकारामाशी जोडता येते.

'आणि शेवटी काय झाले ?' या काव्यसंग्रहामधील कविता गुलामीविरूद्ध आवाज उठविणे, विषमतेविरूद्ध बंड पुकारणे, अन्यायाविरूद्ध लढा उभारण्यासाठी सज्ज करणे ही वैशिष्ट्ये दाखवतात. पण अजूनही प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या वरंवट्याखाली दबणाऱ्यांची संख्या पाहिल्यानंतर आपण नेमके कोणत्या कालखंडात जगत आहोत याची चिंता 'आणि शेवटी काय झाले ?' या काव्यसंग्रहामधील कवितेतून जागोजागी दिसते.

अशाप्रकारे कवी लोकनाथ यशवंत हे श्रेष्ठ आणि महत्त्वपूर्ण कवी म्हणून उल्लेखता येतात. त्यांची कविता दलित समाजातील प्रखर वास्तव सत्य मांडून आपल्या समाज बांधवांना जागृती देते. आंबेडकरांच्या अनुयायानी स्वार्थीपणाने वागून समाजाचा विकास केलाच नाही. स्वत: शिकून नोकरी मिळवून उत्कर्षाकडे जाताना, नेते होताना पुढारी म्हणवून घेताना ही मंडळी सामान्यांच्या हालाखीच्या परिस्थितीकडे मुळीच लक्ष देत नाहीत. त्यामुळे आज समाजात असे अंजन घालून जागृती निर्माण करण्याची खरोखरच गरज आहे. हे काम लोकनाथ यशवंतांची कविता करते. म्हणूनच लोकनाथ यशवंत यांची कविता इतर दलित कवितेपेक्षा निराळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

-----